प्रकरण दुसरे

दलित साहित्याच्या प्रेरणा

प्रकरण दुसरे

दलित साहित्याच्या प्रेरणा

१) डॉ. आंबेडकरांची विचार धारणा

डॉ. आंबेडकरांचे भारतीय साहित्य विषयक विचार हे स्वतंत्र जीवन दृष्टीचे व वाङमयीन दृष्टीचे आहेत. वैदिक ब्राम्हणी साहित्याने प्राचिन भारतात जशी प्रतिगामित्वाची भूमिका बजावली तशी आजही आधुनिक भारतात बजावत आहे. काल त्यांनी ऐंशी टक्के जनतेला कला साहित्य निर्मितीत प्रवेश करु दिला नाही. शुद्र अतिशुद्र आदिवासी बनवून त्यांनी शैक्षणिक, सामाजीक, धार्मिक साहित्य कला या जीवनाच्या महान जगण्यापासून वंचित केले. त्या विरुध्द आंबेडकरांनी क्रांतीकारी लढा दिला आणि इतिहासातील शोषण तत्वाला धरुन मांडले. समताधिष्ठित मूल्यांच्या समाज रचना निर्मितीत समग्र जीवनाचे योगदान दिले. प्राचीन भारतातील वैद्य साहित्य दृष्टीला जीवनात रुजवून लोकशाही विचाराला कुटुंब संस्थेतूनच गतीमान केले. शोषण करणाऱ्या परंपरेला नकार व शोषणाविरुध्द बंड करणाऱ्या तत्वाचा स्विकार भारतीय स्वत: गतीमान करावा ही प्रेरणा उद्घाटीत केली. आज डॉ. आंबेडकरांनी साहित्यदृष्टी ही आधुनिक भारतीय साहित्य शास्त्राची मूलतत्वे म्हणून दलित साहित्य अथवा आंबेडकरवादी साहित्याने स्विकारली आहेत. या साहित्याच्या सौंदर्यशास्त्रीय मांडणी करीत असताना डॉ. आंबेडकरांचा विचार पायभूत ठरतो. डॉ. आंबेडकरांनी समकालीन असलेल्या विचारवंतापेक्षा त्यांची साहित्य दृष्टी ही एक सिध्दांत झाला आहे. श्रमिक, अस्पृश्य, आदिवासी, शुद्र स्त्रिया व मागासलेल्या लोकांच्या सुखदु:खाना अशा आकांक्षाना व मानवतावादी मुल्यांना महत्व

प्रकरण दुसरे

दलित साहित्याच्या प्रेरणा

१) डॉ. आंबेडकरांची विचार धारणा

डॉ. आंबेडकरांचे भारतीय साहित्य विषयक विचार हे स्वतंत्र जीवन दृष्टीचे व वाङमयीन दृष्टीचे आहेत. वैदिक ब्राम्हणी साहित्याने प्राचिन भारतात जशी प्रतिगामित्वाची भूमिका बजावली तशी आजही आधुनिक भारतात बजावत आहे. काल त्यांनी ऐंशी टक्के जनतेला कला साहित्य निर्मितीत प्रवेश करु दिला नाही. शुद्र अतिशुद्र आदिवासी बनवून त्यांनी शैक्षणिक, सामाजीक, धार्मिक साहित्य कला या जीवनाच्या महान जगण्यापासून वंचित केले. त्या विरुध्द आंबेडकरांनी क्रांतीकारी लढा दिला आणि इतिहासातील शोषंण तत्वाला धरुन मांडले. समताधिष्ठित मूल्यांच्या समाज रचना निर्मितीत समग्र जीवनाचे योगदान दिले. प्राचीन भारतातील वैद्य साहित्य दृष्टीला जीवनात रुजवून लोकशाही विचाराला कुटुंब संस्थेतूनच गतीमान केले. शोषण करणाऱ्या परंपरेला नकार व शोषणाविरुध्द बंड करणाऱ्या तत्वाचा स्विकार भारतीय स्वत: गतीमान करावा ही प्रेरणा उद्घाटीत केली. आज डॉ. आंबेडकरांनी साहित्यदृष्टी ही आधुनिक भारतीय साहित्य शास्त्राची मूलतत्वे म्हणून दलित साहित्य अथवा आंबेडकरवादी साहित्याने स्विकारली आहेत. या साहित्याच्या सौंदर्यशास्त्रीय मांडणी करीत असताना डॉ. आंबेडकरांचा विचार पायभूत ठरतो. डॉ. आंबेडकरांनी समकालीन असलेल्या विचारवंतापेक्षा त्यांची साहित्य दृष्टी ही एक सिध्दांत झाला आहे. श्रमिक, अस्पृश्य, आदिवासी, शुद्र स्त्रिया व मागासलेल्या लोकांच्या सुखदु:खाना अशा आकांक्षाना व मानवतावादी मुल्यांना महत्व

आंबेडकरांनी विरोध केला. "हा संघर्ष म्हणजे परकीय इंग्रज मुसलमान विरुध्द भारतीय असाच आहे. फरक इतकाच आहे की इंग्रज मुसलमान यांच्या संघर्षाचा काळ लोकांना आठवतो आणि परकिय आर्थ वैदिक ब्राह्मण विरुध्द स्थानिक भारतीय यांच्या संघर्षाचा काळ लोकांच्या स्मरणातून दृष्टीआड झाला आहे परंतु तो दृष्टिआड झालेला संघर्ष वेद वेद गीता रामायण महाभारत या ब्राह्मणी या ग्रंथामध्ये पुसटसा चित्रित केला आहे. ऋग्वेदात दास दस्यू पणी विरुध्द ऋग्वेदी आर्य यांचा संघर्ष मिळतो."(१)

"आर्यांनी स्वत:ला श्रेष्ठ म्हणवून घतले. आणि स्थानिक भारतीय जनतेला कनिष्ठ म्हटले आहे. स्वत:ला देव म्हणवून घेतले आणि भारतीय बहुजन नेत्यांना असूर, राक्षस अशी निंदाजनक संवेदना दिली हे सगळे भारतीय समाजातील सिंधु संस्कृतीचे व महादेवाचे उपासक होते आणि ही संस्कृती लुटारु ऋग्वेदिक आर्यानी जाळली याचे पुरावे मोहेंजोदडो हडप्पा संस्कृतीच्या उत्खननातून व ऋग्वेदाच्या अभ्यासातून साकार झाले आहेत."(२) परकीय आर्यानी व कवी ब्राह्मणांनी आर्याच्या राज्यसत्तेला पुरक अशीही वाङमयनिर्मिती केली. बहुजन लोक समुहांना मारण्याची प्रेरणा ब्राम्हणऋषी देत होते. म्हणून वैदिक व पुराण वाङमयात ऋषीला अतिशय महत्व दिले आहे. ब्राम्हण ऋषीबद्दल एक आदर भावनेची जाणीव सतत या साहित्याने शिकविली आहे. भारताचा बहुजन समाज प्राचीन भारतातील नाग व असूर समाज आहे. त्यांना ब्राम्हणी साहित्याने चुकीचे खोटे रेखाटले त्यांना क्रुर हिंस्त्र संबोधले आणि साहित्यातील सत्य उलटे केले आहे. खरे तर आर्य ब्राम्हण हेच हिंस्त्र आहेत खरे नीच रानटी आणि क्रुर आहेत त्यांनी अस्पृश्यता निर्माण करुन मानवाचा छळवाद केला. शुद्र अतिशुद्रला स्त्रियांना आडाणी ठेवले. हे तत्व आज ही पहावयास मिळते. या क्रुरतेला वेदवाङमयानेही सुरेखपणे आर्य राजवटीत साथ दिली.

भारतीय समाज, संस्कृती धर्म इतिहास साहित्य कायदा राजकारण अर्थकारण इत्यादीच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी मुलभूत व युगप्रवर्तक विचार मांडले आहे. त्यांनी संत साहित्याबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. कोणतेही साहित्य समाज मानवी जीवन धर्म संस्कार, उपदेश, प्रयोजन यांच्यापासून भिन्न नसते. संत साहित्याने सुध्दा ब्राह्मणी साहित्याचे तत्वज्ञान वर्ण व्यवस्थेतील शोषण मुल्य सांगितले आहे भक्ती ईश्वर व परलोकसापेक्ष असाच विचार साहित्यातून प्रमुख होवून मांडला आहे. संतानी आपले जीवन व साहित्य प्रामुख्याने परमार्थ विचाराच्या निर्मितीतच घालविले. ''मोक्ष प्राप्ती हेच मानवी जीवनाचे ध्येय असे संत साहित्य सांगते कर्मविधायक पुनर्जन्म मोक्ष ईश्वर भक्तीचे आणि वर्णव्यवस्थेचे समर्थन करते. त्यामुळे समाज जीवनावर वाईट परिणाम झाल. शुद्र, अतिशुद्र व स्त्रीया यांची गुलामगिरी अधिक दृढमूल झाली. वेद, गीता रामायण, महाभारत इत्यादी ब्राह्मणी ग्रंथही आंबेडकरानी नाकारले आहेत. प्राचीन मध्ययुगीन साहित्यातील वर्णव्यवस्थेच्या जाणीवेमुळे नकाराची भूमिका साकारली आहे. संतानी शुद्र अतिशुद्रांना कसे डांबून ठेवले होते त्यांना धर्मत्तर करुन देत नव्हते असा विचार व्यक्त करताना डॉ. प्रकाश खरात म्हणतात. ''परंतु शुद्र, अतिशुद्र त्यांना मुसलमान झाल्याने हक्काने फक्त पाणी मिळाले होते. रस्त्याने माणूस म्हणून चालण्याची संधी मिळाली होती. ही प्राथमिक गरज शुद्र अतिशुद्र धर्मातराने पूर्ण करीत होते. तर त्यांना संत रोखून धरत होते. भक्ती शिकवून वर्णव्यवस्थेच्या गुलामगिरीत डांबून टाकत होते. हेमांद्री पंडीतांचीच व्रत वैकल्याची गुलामगिरी संत थोड्या वेगळ्या भाषेत भक्तीच्या साधनांनी घट्ट करीत होते. म्हणून संत साहित्य आणि हेमाद्री पंडीत ब्राम्हण पुरोहितांचे व्रतवैकल्य विचार हे दोनही एकाच ब्राह्मणवादी नाण्याच्या दोन बाजू आहेत.''(३) अशा

या संत साहित्याला व संताना बंडखोर ठरविता येत नाही. त्यांच्या शिकवणूकीला चांगले म्हणता येत नाही. डॉ.आंबेडकर म्हणतात ''साधुसंताची शिकवण केवळ विद्वानाच्या शिकवणीपेक्षा कितीही भिन्न आणि उत्कर्षकारी असली तरी सुध्दा शोकजनक रीतीने ती अपयशी ठरली हे कोणालाही मान्य करावे लागेल. दोन कारणासाठी ही शिकवण निष्फळ ठरली. पहिले म्हणजे कोणत्याही संतानी जाती पध्दतीवर हल्ला केला नाही, तर याविरुध्द जातीभेदावर पूर्ण विश्वास ठेवणारे होते. डॉ. आंबेडकर एकनाथांबद्दल विचार मांडताना म्हणतात, ''धर्मात्मा नावाच्या सिनेमामध्ये अस्पृश्याच्या मुलाला स्पर्श करण्यासाठी व अस्पृश्यासोबत जेवण करण्यासाठी धैर्य दाखविले म्हणून एकनाथाला हिरो म्हणून दाखविले आहे, पण या संत एकनाथाने सुध्दा असे का केले याचं कारण तो जातीभेदाच्या व अस्पृश्यतेच्या विरोधी होता असे नव्हे तर अस्पृश्यतेला स्पर्श केल्यामुळे झालेला विटाळ गंगेच्या पाण्याने स्नान केल्यानंतर निघून जातो असे त्याला वाटत होते.''(४) असे हे संत व संत साहित्य जातीवाद वर्णव्यवस्था यांच्या माध्यमातून ब्राह्मण वर्चस्वालाच समाजात रूजवत होते. युगांयुगापासून चालत आलेल्या ब्राह्मणी धर्म शिकवित होते. म्हणून संत साहित्य हे ब्राह्मणी धर्माचे म्हणजेच हिंदू शोषणाचे एक अंग म्हणूनच प्रकट झालेले साहित्य आहे.

अधुनिक मराठी साहित्याचे स्वरुप फुले, लोकहितवादी आगरकर, रानडे व डॉ. आंबेडकर यांच्या विचाराने साकार झाले आहे. आणि या विचार परंपरेला थोपवून निकराचा प्रयत्न करणाऱ्या धर्म शक्तीनेही आपल्या प्रतिगामी जीवनदर्शनानेही साहित्य प्रवाह निर्माण केला. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाने व साहित्य मीमांसेने मात्र समग्र आधुनिक चिंतनालाच एक नवे वळण दिले. त्यांच्या चिंतनातून एक साहित्य चळवळच

जोमाने फोफवला गेली. त्यांच्या समीक्षा-चिंतनाचे स्वरुप 'आंबेडकरवाद' या नावाने आज अभ्यासले जाते. त्यांचा साहित्य विचार हा अधुनिक साहित्याचा मापदंड ठरला आहे. अधुनिक मराठी साहित्य हे प्रामुख्याने वैदिक ब्राह्मणी साहित्याचा अशय घेऊन विकसीत झाले आहे. वेद, उपनिषेद, गीता, रामायण, महाभारत या ग्रथांवर भाष्य करीत निर्माण झाले आहे. यांचे उदा. म्हणजे खांडेकरांची ''ययाति'' सारख्या कांदबरीची निर्मिती झाली तिला ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविले. पुराण कथा घेऊन आधुनिक साहित्य झपाट्याने वाढले. डॉ. आंबेडकराचा उदय उपेक्षित व्यक्तीच त्याच्या साहित्याला नवा इतिहास प्राप्त करुन देणाऱ्या लेखकाचा उदय आहे. जे बहिष्कृत जीवन आहे. त्याच्या विचारात व कृतीत खऱ्या अर्थाने आधुनिक मूल्य जाणीवा काठोकाठ भरुन वाहत आहेत. आधुनिक साहित्यामध्ये वर्णव्यस्थेमुळे दलितांचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलला आहे हे विचार स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी आपल्या साहित्य विचारातून साहित्य आणि जाती संस्था यांचे परस्पर काय परिणाम घडले ते प्रथमच सांगितले आणि साहित्य समीक्षेची दृष्टी आपल्या चिंतनाव्दारे मांडली ते म्हणतात ''आपल्याकडे त्यावारी किती धनिकवर्ग यांच्यामध्ये रसिकतेची दृष्टी असत नाही. हा त्यांचा दोष असत नाही चातुवर्ण्याचा आहे. चातुंर्वण्याने जे वर्णभेद पाडले आहेत त्यात कोणी काय करावे त्याचा खुलासा केला आहे. ब्राह्मणांनी संस्कृती आणि कला यांचे संवर्धन करावे, वैश्य लोकांनी पैसा कमवावा असे हे धार्मिक समजले जाणारे नियम असल्याने प्रत्येकजण ठराविक ठशानं जीवनाकडे पहात असतो. त्यामुळे त्यांच्यातील रसिकता मेली आहे. आपल्याकडे कले विषयी जी अनास्था दिसून येते यांचे कारण चातुर्वर्ण्य आहे. चार्तुवर्ण्यमुळे हीन

धर्मातील लोकांच्या रसिकतेचेही उपहरण झाले आहे''(५) डॉ. आंबेडकरांनी साहित्य समृध्दतेला हानीकारक ठरलेली तत्वे चातुर्वर्ण्य आहे हे समाज व्यवस्थेतून शोधून मांडले. लोकजीवनावर झालेले जाती सस्थेचे दुष्परिणाम सांगितले आहेत. डॉ. आंबेडकरांनी दलित शोषित माणसाच्या समग्र पातळीवरचे शोषण नष्ठ करण्यासाठी ग्रंथाचे केलेले शोषण नाकारावयास सांगितले. जुन्या विचाराच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्याशिवाय नवी संवेदना नवा माणूस घडणार नाही. म्हणून वर्णव्यवस्था लादणाऱ्या ग्रथांची परखड मीमांसा केली. गुलामगिरीतून शोषण केले जाते. म्हणून आंबेडकर म्हणतात ''ज्याच्याशी तुम्ही दोन हात करावेत असा तुमचा शत्रु जाती पाळणारे लोक नसून ज्या शास्त्राने लोकांनी जातीधर्म शिकविला ती शस्त्रे तुमचा शत्रु होत हे उघड आहे''(६) म्हणूनच साहित्य हे सुध्दा शोषण नष्ट करण्याचे हत्यार आहे. 'साहित्य' या संकल्पनेकडे पाहण्याचा डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन अत्यंत साधक आणि सार्थ आहे. साहित्य म्हणजे रंजन नव्हे केवळ ज्ञानही नव्हे तर ते संशोधिलेले ज्ञान आहे. अनुभवांच्या मंथनातून वर आलेले सत्यरुपी नवनित आहे असे त्यांनी मानले.

प्राचीन भारतीय साहित्य व संस्कृतीचा मुख्य प्रवाह बौध्द साहित्य व संस्कृती विचार आहे. सिंधू संस्कृतीतून व त्याच्या लोकजीवनातून निर्माण झालेली परंपरा अवैदिक परंपरा आहे. आर्यानी वर्णव्यवस्था, जातीयवाद व अस्पृश्यता हे ब्राह्मणी समाज रचनेचे मूलधार करून विकास केला प्रत्येक वर्गाला अधिकार आणि जन्मत:च कामाची विभागणी केली. कर्मकांड, यज्ञसंस्था, स्वर्ग कर्मविपाक या साधनाच्याव्दारे हिंधु बहुजनांनी लुप आरंभली. माणूस म्हणून त्यांचे अधिकार काढून घेतले त्यांना गुलामीचे जीवन जगावे लागले. या शोषणा विरोधात बुध्दाने समतेचा विचार दिला.

''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' असा सिध्दांत दिला आणि बौध्द धर्म बौध्द साहित्य व संस्कृतीचा स्वीकार प्राचीन भारतीय जनतेने केला. बुध्दाला जातियवादी ब्राह्मणी वैदिक विचार परंपरेत गोवण्याचा प्रयत्न हा मावतावादावरील कलंक आहे. म्हणून त्यांनी मूलभूत वैचारिक प्रश्न विचारले आणि बुध्दाचे खरे स्वरुप आधुनिक काळातील प्रमाणिक विचारवंतासमोर ठेवले. डॉ. आंबेडकर म्हणतात ''उपनिषेदातून बुध्दाने सारे घेतले असे हिंदू तत्ववेते म्हणतात मला अशा लोकांबद्दल फारच आश्चर्य वाटते. ज्यांनी कोणी ब्राह्मणांच्या १३८ उपनिषदांचा अभ्यास केला असेल अगर ती पुर्णपणे वाचली असतील तर त्यात ब्राह्मण व आत्मा या दोन गोष्टीशिवाय काय आहे असे त्यांना वाटले. उपनिषदांच्या या कारखान्यातील ब्रम्ह व आत्मा या दोन गोष्टीकडे पाहिले तर बुध्दाने त्यापैकी एक ही गोष्ट मान्य केली नाही. बुध्दाने स्पष्ट सांगितले मला ईश्वर नको या पृथ्वीतलावर जन्मास आलेल्या प्रत्येक माणसात सुख व शांती मिळाली पाहिजे व सर्वांनी सुखाने राहिले पाहिजे बुध्दाने नुसती शांतताच सांगितली नाही बुध्द हा खरा विचारवंत होता'' (७) बुध्द व त्यांचे तत्वज्ञान बौध्द वाड:मयात विविध लेखकांनी मांडले ब्राह्मणी हंदू तत्वज्ञानापेक्षा ते न्याय मुल्यांवर उभारलेले आहे त्यामुळे बौध्द संस्कृती व साहित्य विचार जणाने वेदनिय म्हणून स्वीकारली आहेत. ''बुध्दाला वेद मुळीच मान्य नव्हते हे त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले होते. वर्ण व्यवस्थाही बुध्दाला मान्य नव्हती वाड:मयात बुध्दाने चातुवर्णावर पदोपदी प्रहार केलेले आहेत आणि त्यामुळेच त्यांना हिंदू धर्माचा कट्टर विरोध झाला बौध्दाने जातिभेदावर कठोर प्रहार केले मी ब्राम्हणाचा व्देष करीत नाही परंतु जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ हे मी मान्य करणार नाही अशी त्याची विचारसणी होती''(८) असे विचार बौध्द वाड:मयात विषय मांडले आहेत बौध्द धर्माने व साहित्याने माणसाचं महानपण

विकसीत करणाऱ्या समाज रचनेचा पुरस्कार केला परंतु बौध्द जीवनदृष्टी भारतातून नाहीशी केल्यामुळे ती जनतेच्या स्मृतीतूनही नाहीशी झाली. तीचे मुळरुपच डॉ. आंबेडकरांनी पुन्हा सांगीतले आहे. डॉ. आंबेडकरांच्या बौध्द साहित्य विचाराने भारतीय जीवनात एक महान सांस्कृतिक क्रांती केली या विचाराने शोषितांचे जीवन सुंदर केले आहे. त्यांना एक स्वतंत्र्य कलादृष्टी प्रदान केली आहे.

२) सुशिक्षित दलितांच्या जाणिवा :-

''दलित जाणीव'' ही संघर्षाशी नाते असणारी क्रांतीकारी मानसिकता आहे. विषम व्यवस्थेखाली चिरडलेला माणूस.... केंद्र मानून जातीव्यवस्थेविरुध्द विद्रोह करणारी ही जाणीव या जाणिवेची प्रेरणा आंबेडकरी विचार आहे. परंतु दलित साहित्य लेखनात ''दलित जाणीवा'' महत्वाची असते. ''दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार आशावादी दृष्टीकोन, दलित जीवनातील दु:खे तरलतेने टिपण्याची प्रवृत्ती तसेच सामाजिक बांधिलकीशी असणारे अतुट नाते होय'' ही जाणीव हिच दलित साहित्याचा आधार आहे. मला वाटते या सदंर्भात काही नामवंत दलित अभ्यासकांनी मांडलेल्या विचाराचा आढावा घेणे योग्य होईल.

प्रा. नरहर कुरुंदकरांना दलित जाणीवा ही जीवनदृष्टी आहे असे वाटते. म्हणूनच त्यांनी ''खरा प्रश्न दलितांच्या जीवनाच्या चित्रणाचा नाही तर कोणत्या जाणिवेतून हे चित्रण येते हा आहे.'' किंवा ''दलित साहित्याचा आधार एखाद्या जातीत जन्माला येणे हा नसतो तो आधार सामाजिक जाणिवेतच शोधला पाहिजे.''(९) तर दलित जाणिवेचे स्वरुप स्पष्ट करताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात. ''दलित जाणीव विद्रोहात्मक आशावादी क्रांतीकारी स्वयंभू नवीन मान व मध्यवर्तीत्व, अनात्मवाद, अनिश्वरवाद,

गतिवाद, ज्ञानविज्ञाननिष्ठ, गतिशून्य, मानव केंद्रितता, इहलोक निष्ट मानवाला केंद्र कल्पिणारी न्यायवादी जाणीव आहे.'' (१०) तर दलित जाणीवेचे स्वरुप स्पष्ट करताना गो. पु. देशपांडे म्हणतात. की, ''मराठी साहित्यात ही दलित संवेदनशीलता नवीन आहे व ही कृष्ण संवेदनशीलतेप्रमाणे दलित संघर्षाशी जोडलेली आहे.''(११) तर प्रा. गं. बा. सरदार दलित जाणीवेसंबंधी विवेचन करताना म्हणतात ''तीव्रता व दाहक अनुभवातून व जाणिवेतून दलित वाङमय निर्मिती होत असते. त्यात नवजागृत समाजाची आत्मविष्काराची व आत्मविकासाची जिद्द् पदोपदी दिसून येते. दलित साहित्यात साहित्यमुल्ये कमी असतील पण माणसाची तीव्र संवेदनशीलता व मुक्त भावनोद्रेक काठोकाठ वाढत आहे. त्यात दुबळेपणाला थारा नाही.''(१२) शंकरराव खरातांच्या मते ''दलित जाणीवांतून निर्माण झालेल्या दलित साहित्य कालकृती सत्यार्थाने वास्तववादी व जीवनवादी आहेत त्यात तास्यमुक्तीचा आंबेडकरी दृष्टिकोन आहे.''(१३) तर डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते ''दलित वाङमय हे व्यक्तिनिर्मिती नसून समष्टीच्या मनाचा अविष्कार असतो'' (१४) असे सांगून दलित जाणीव समाजनिष्ठ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. डॉ. योगेंद्र मेश्राम दलित जाणीवेसंबंधी विस्तृत विचार मांडताना म्हणतात. ''दलित जाणीव म्हणजे दलित जीवनासंबंधीचा दृष्टिको,न एक धारणा जीवनाच्या मुल्यप्रणाली विषयीची एक डोळस जाणीव ही जीवनमूल्यप्रणाली म्हणजे जीवनाचे महत्व सांगणारी आचार विचार प्रणालीच होय ही जीवन विषयक आचार विचारासंबंधीची तीळस जाण दृष्टिकोन भूमिका व धारणा म्हणजे दलित जाणीव होय या जीवनासबंधीची ही जाणीव ही दलित समाजाची जाणीव असते.''(१५)

वरील दलित जाणीवेसंबंधीच्या विविध अभ्यासकांनी मांडलेल्या विचारांचा परामर्श घेतल्यावर हे स्पष्ट होते की दलित साहित्य हे समाजातील जाणिवेचा प्रत्यय

आणून देणारे साहित्य आहे. ही जाणीव दलित संवेदनशीलता दलित जीवनाविषयक दृष्टिकोन व दलित मानसिकता स्विकारणारी जाणीव आहे. ही जाणीव व्यक्तीकेंद्री व समाजकेंद्री अशा दोन्ही पातळ्यावर अविष्कृत होवू शकते. अशावादी दृष्टीकोनातून जीवनपरिवर्तनाचा विचार दलित जाणीवेत केंद्रस्थानी असल्यामुळे ती सामाजिक बांधिलकी आहे आणि म्हणूनच दलित जाणीवही एक व्यक्तीच्या माध्यमातून जरी अविष्कृत होत असली तरी ती जाणीव त्या व्यक्तीपुरतीच मर्यादित न राहता 'स्व' आणि 'स्वेत्तर' समाजाला स्वत:च्या केवत घेण्याचे सामर्थ्य दलित जाणिवेत आहे. शोषणाविषयक जाणीव व शोषणाच्या निर्मुलनाचा विचार ही या जाणिवेची दोन अंगे आहेत. अशी ही दलित जाणिवच दलित साहित्याचा मुळ आधार आहे. असे दिसून येते. दलित जाणीवा ही दलित साहित्याचा केंद्रबिंदू असून मानव हा त्याचा मध्यगाभा आहे ही दलित जाणीवा दलित समाजाच्या संघर्षाशी बांधलेली असून ती त्या दलितपणातून मुक्त करुन स्वातंत्र्य व सामाजिक समता प्रस्थापित करु पाहते ही जाणीव सामाजिक जीवन वास्तवाचा जीवंत वेध घेते. माणसांमाणसात दुफळी निर्माण करणाऱ्या वाङमय व समाज मूल्यांच्या विरोधात बंड करुन उठते.

३) दलित संघशक्तीच्या प्रेरणा :-

दलित साहित्याची निर्मिती-प्रेरणा स्पष्ट करताना उगमस्थान शोधण्याचा, प्रयत्न अनेकांकडून झाला आहे, होत असतो काहीजण तो उगम बुध्दकाळापासून शोधतात, काहीजण संतकवी चोखामेळा पर्यंत पाहत असतात. काही क्रांतीवीर फुल्यांपर्यंत जातात. तर काही श्री. म. माटे. यांच्यामध्ये शोधण्याचा प्रयत्न करतात. या त्यांच्या विधानासाठी ते अशी बाजू मांडतात की जरी त्यावेळी ''दलित साहित्य'' ही संज्ञा वापरली गेली नसली तरी त्या त्या काळात दलितांविषयीच्या पिळल्या जाणाऱ्या

विषयीच्या अन्याया विरुध्द त्यांनी आपल्या लेखणीव्दारे वाचा फोडली आहे. म्हणून ते खरेखुरे दलित साहित्याचे जनक होते. जी मंडळी हे विधाने करतात. त्यांनी निश्चितच विषम समाजा-विरूध्द बंडाचे निशान रोवले, त्यावर हल्ला चढवून ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' असा नारा लावला. त्यांची शिकवण त्याचे आदर्श हे सतत प्रेरणादायी ठरले यात शंका नाही. परंतु ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ पध्दतीने विचार व मूल्यमापण केल्यानंतर हे स्पष्ट दिसून येईल की ''दलित साहित्याचे बीज किंवा प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार त्यांची जीवनदृष्टि, त्यांनी केलेल्या चळवळी ह्या सगळ्यांचा इतिहास येथे देणे शक्य नाही. या सर्व गोष्टीमुळे दलित समाज मानसिक गुलामगिरी व लाचारीतून मुक्त झाला म्हणून दलित साहित्याचे मुल प्रेरणास्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेउकर हेच होते. शिवाय अनेक दलित लेखकांनी हे स्पष्ट केले आहे की माझ्या लेखनाची प्रेरणा आंबेडकर हीच आहे. दलित साहित्याचे एक प्रवर्तक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी तर स्पष्ट म्हटले आहे की, ''दलित साहित्य चळवळीचे आद्य प्रेरक व प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असून बाकीचे आम्ही सारे त्याचे पाईक आहोत''(१६)

यावरून हे स्पष्ट होते की, दलित साहित्याची प्रमुख प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असून त्यांनीच दलित साहित्याचा पाया घातला. तरी दलित साहित्याची निर्मिती-प्रेरणा स्पष्ट करताना प्रा. डॉ. वि. स. जोग म्हणतात की ''दलित साहित्याची निर्मिती सामूदायिक असून या निर्मितीत मार्क्सचा सहभाग आहे''(१७) तर दलित कथेचे शिल्पकार म्हणून सर्व परिचित असलेले बाबूराव बागुल म्हणतात की ''मार्क्सने मला दिलेल्या वैचारिक धर्माचा मी कृतार्थ आहे''(१८)

वरील दोन्ही विधाने लक्षात घेण्यासारखी असली तरी हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की, मार्क्सवाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकरवाद या दोन्ही विचारधारा अगदी पुर्णपणे भिन्न आहेत. मार्क्सवादाच्या निर्मितीला मार्क्सचा समाजातील अर्थिक व्यवस्था कारणीभूत होती. दलित लढयाच्या निर्मितीला भारतीय जातिव्यवस्था आणि त्यावर आधारित समाजव्यवस्था (आर्थिक, राजकिय, धार्मिक, इ.) अशी पार्श्वभूमी होती. त्यामुळे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यामध्ये साधर्म्य असले तरी त्यातील संघर्षस्तर वेगळे आहेत. डॉ. आंबेडकरांचा विचार हा या भूमीत जन्मलेल्या सामाजिक क्रांतीचा आहे. मार्क्सवादी दृष्टिकोन भौतिकवाद असून कामगारांना संघटीत घेऊन भांडवलशाही विरुध्द संघर्ष केल्याशिवाय शोषितांची प्रगती होणार नाही. ही मार्क्सची भूमिका होती. परंतु भारतीय समाजव्यवस्था ही जातीयवादी असल्याने मार्क्सवाद येथे दुबळा ठरतो, शोषक आणि शोषिकांमधील अंतर दूर करुन अर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला. परंतु हे सत्य आहे की, दलितांचा प्रश्न केवळ अर्थिक समतेने सुटणारा नाही त्यांची खरी समस्या सामाजिक वा सांस्कृती आहे. त्यांना प्रस्थापिताविरूध्द, जातियतेविरुध्द सतत संघर्ष करावा लागतो म्हणून जोपर्यंत भारतात जातियता आहे तो पर्यंत मार्क्सवाद भारतात रूजू शकणार नाही. शिवाय मार्क्सवादी साहित्य संकल्पना ही प्रत्यक्ष जीवनातून उगम पावते व तिला सामाजिक आशय प्राप्त होतो. या सामाजिक आशयातच सामाजिक जाणीव अभिव्यक्त होत असते. ही जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व त्याच्या लढयांनी घडविलेली आहे. दलित साहित्याच्या प्रमुख प्रेरणा डॉ. आंबेडकर व त्यांचे तेजस्वी विचार व युगप्रवर्तक नेतृत्व हेच ठरते.

दलित साहित्याची निर्मिती प्रेरणा स्पष्ट करताना ती संत साहित्यातून झाली

आहे. अशी केली जाते ही गोष्ट खरी आहे की संत संप्रदाय उदार मतवादी होत ! त्यांनी सर्व जाती जमातीचे संत निर्माण केले असे असले तरी संतानी आध्यात्मिक पातळीवर समता प्रस्थापित केली. सामाजिक पातळीवर नव्हे शिवाय कोणत्याही संतानी चार्तुवर्ण्य व्यवस्थेविरुध्द आवाज उठवला नाही उलट काही संतानी या व्यवस्थेची जोमदार पुरस्कार केला ! ती अधिकाधिक बळकट करण्यास मदत केल्याने दिसून येते. संत रामदासानी तर " दासबोध" या आपल्या ग्रंथात स्पष्ट म्हटले आहे की, "माझ्या माहिती नुसार संतानी जाती भेदाच्या व अस्पृश्यतेचा विरुध्द कधीही युध्द पुकारले नाही " (४) मुळात संतानी जातीव्यवस्था सामाजिक संदर्भात नाकारली नाही. ज्ञानेश्वरांची सारी धडपड स्वत:चे ब्राह्मण्य मान्य करुन घेण्यासाठीच होती. देवधर्म, रूढी, परंपरा किबहुना अध्यात्म हाच संत साहित्याचा गाभा होता. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या मानवतावादाचा पुरस्कार करते माणसामाणसात वैरत्वाची भावना निर्माण न करता बंधुत्व प्रेम समजात रुजविण्याचा प्रयत्न करते. चांगल्या मूल्यांचा स्वीकार करते. म्हणून तर हे साहित्य क्षेष्ठ ठरते.

दलित साहित्याची निर्मिती संबधी मांडण्यात आलेल्या मतमंतातराचा विचार करता स्पष्ट होते की, भगवान गौतमबुध्द, महात्मा फुले, कार्लमार्क्स व संतसाहित्य यांच्या प्रेरणा दलित साहित्याच्या निर्मितीस वरवर पाहता कमी अधिक प्रमाणात कारणीभूत ठरतात असे वाटत असले तरी हे खरे आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचे क्रांतीकारी आचार-विचार युगप्रवर्तक तत्वज्ञान आणि त्यांची लखलखीत जीवन कर्तृत्व होय. दलित साहित्याची प्रभावी व मुख्य प्रेरणा होय.

डॉ. आंबेउकर स्वत: जन्माने अस्पृश्य असल्याने जातीविषमतेचे अनेक घटना

त्यांनी सोसल्या व अनुभवल्या होत्या. अवमानाची झळ त्यांना लागलेली होती म्हणून तर आपल्या अस्पृश्या बांधवाना जागृत व शोषणमुक्त करण्याचे खुप मोठे कार्य त्यांनी केले हिंदू धर्म रूढी परंपरा बलुतेदारी इत्यादी वाईट चालीरीतीचा त्याग करुन स्वाभीमानाने स्वतंत्र्य जीवन जगण्याचा उपदेश त्यांनी आपल्या बांधवाना केला यामुळे दलित समाजात नवचैतन्य संचारले त्यांचा आत्मविश्वास व स्वाभिमान जागृत झाला. आंबेडकराची बुध्दी निष्ठा ही स्वाभाविक होती. तो बहाणा नव्हता संघर्ष हेच त्याच्या जिवनाचे सुत्र होते. हिंदू समाजाची सामजिक विषमतेवर आधारलेली रचना उखडून टाकून सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित नवसमाज भारतात निर्माण होवा असा त्यांचा आग्रह होता. अन्याया विरूध्द झगडून आपले न्याय हक्क मागण्याचा विचार त्याच्या प्रत्येक कृतीतून दिसून येतो. हिंदू समाजाच्या दान धर्मावर जगण्याची आता अस्पृश्यांना मुळीच इच्छा नाही. हे स्पष्ट करताना २६ मार्च १९४६ रोजी मध्यवर्ती विधिमंउळात केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ''आम्हाला गुलामित राहण्यास लावणारी, आम्हाला नीतिभ्रष्ट करणारी भीक मूळीच नको आहे. आम्ही आमच्या न्याय हक्कासाठी झगडतो आहेत. आम्हाला ते मिळालेच पाहिजे आणि तुम्हाला मी निक्षून बजावतो की, जर आमच्या न्याय लढयाला विरोध केला गेला तर रक्त सांडून आमचे हक्क मिळवू आमचे ध्येय हस्तगत करु '' (२०) या किंवा आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना दिलेला संदेश ''झगडा आणखी झगडा त्याग करा आणखी त्याग करा त्यागाची आणि हालाची पर्वा न करता एक सारखा झगडा चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल''(२१) यासारख्या त्यांच्या क्रांतीकारी वाणीने शेकडो वर्ष पशूपातळीवर पशू म्हणून जीवन जगणाऱ्या दलित

समाजाला मनुष्यत्वाची जाणीव झाली तो माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त झाला म्हणूनच तर दलित लोक जीवनाची व दलित साहित्याची प्रेरणा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कडेच बोट दाखवावे लागेल. प्रा. गं. भा. सरदार यांनी तर स्पष्ट म्हटले आहे की ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विचार आणि कृती यांचे संमेलन आंबेडकर म्हणजे नव्या जीवणाचा नवा अविष्कार''(२२) असा सार्थ शब्दात त्यांनी आंबेडकरांचा गौरव केला आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की ''परंपरा, पोथी आणि परमेश्वरच नाकारण्याचे सामर्थ्य दलित लेखकांना आले ते आंबेडकरांच्या विचारामुळेच दलित साहित्याच्या निर्मिती मागे बाबासाहेबांचा विचार आहे ! त्याच्या विचारामुळे ज्यांचा प्रकृतिधर्म घडला ते दलित लेखक विद्रोहाची ध्वजा घेऊन पुढे आले आहेत. हे विसरता येणार नाही'' (२३) तर शंकरावा खरात म्हणतात की, ''समाज परिवर्तनाचे समता, बंधुता स्वातंत्र्य व न्याय आणि प्रज्ञाशील करुणा अशा अमूल्य मूल्यांवर आधारलेली नवी समाज निर्मितीची नवी विधायक दृष्टी डॉ. आंबेउकरानी दिली म्हणून तर डॉ. आंबेडरांचे जीवन आणि विचार दलित साहित्याच्या प्रेरणा होत'' (२४) तर डॉ. योगेद्र मेश्राम म्हणतात ''बाबासाहेब झाले नसत, तर कदाचित तुम्ही-आम्ही आपण झालो असतो की नसतो आपल्या सामाजिक वाङमयीन शक्ती-प्रतिभेचा वैचारीकतेचा तसेच सगळया साहित्य निर्मितीचा मुख्य प्रेरणा स्त्रोत्र एकटे आंबेडकरच आहेत यात अतिशयोक्ती आहे असे मला वाटत नाही'' (२५) त्यांच्या विधानातच भावनात्मकता अधिक आहे असे वाटत असले तरी मला वाटते ही वस्तुस्थिती आहे.

वरील सर्व मतावरून हे अगदी स्पष्ट होते की, डॉ. बाबसाहेब आंबेडकरांमुळेच दलित समाजात नवचैतन्य संचारले त्याच्यात जाणीव जागृती निर्माण झाली त्यांची लाचारी व न्यूनगंड जाऊन स्वाभिमान व आत्मविश्वास त्याच्या ठिकाणी निर्माण झाला

किंबहुना आज दलित समाज जो मानाने उभा आहे तो केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वामुळेच होय. आपल्या कोटयांवधी बांधवांना हिंदू धर्माने केलेल्या कोंडीतून मुक्त करुन त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करून तो शिकू लागला. शिक्षणाने त्याच्या ठिकाणी जागृती निर्माण झाली ते लिहू लागले. आपले दु:ख विद्रोह शब्दबध्द करू लागला म्हणून दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ. आंबेडकर हेच ठरतात. डॉ. आंबेडकरांसारख्या एका बंडखोराकडे दलित साहित्याचे जनकत्व जावे हाच दलित साहित्याचा लक्षणीय विशेष आहे. कोणत्याही सुशिक्षित दलितास डॉ. बाबासाहेबांचे स्मरण लेखनाची प्रेरणा देते म्हणून दलित साहित्याची मूलप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबडेकर हे निर्विकार सत्य होय.

४) बदलत्या जीवन धारणेतून आलेल्या प्रेरणा -

या माणसाला स्पर्श केला तर विटाळ होतो. जन्मल्यापासून मरेपर्यंत यांच्या वाट्याला उपेक्षा येते. अज्ञान, दारिद्रय, हाल, अपेष्ठा उच्चवर्णीयांकडून होणारे अमानुष अत्याचार यांनी हा उपेक्षित भारत भरला आहे. धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, व्यावसायिक बंधनामुळे या समाजाची प्रगती होऊ शकली नाही. भारताच्या विविध भागांत कोणी त्यांना बहिष्कृत अस्पृश्य परिया किंवा अतिशूद्र म्हणत. महार ही हिंदू समाजातील अस्पृश्य गणलेल्या अनेक जातीपैकी एकच जात होती. अशा या महार जातीत डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म झाला. ते महार जातीत जन्माला आले म्हणून त्या जातीला सोसाव्या लागणाऱ्या अस्पृश्यतेची अवमानाची झळ त्यांना लागली. त्यांना आपल्या बांधवांच्या छळाची कल्पना आली. त्यांनी अस्पृश्यतेच्या मूळाशी जाण्याचा प्रयत्न केला. वाचन, मनन, संशोधन केले. विचार मंथन केले आणि

आपल्या स्वतंत्र प्रज्ञेने नवा इतिहास मांडला. त्यातून नव्या दलित पिढीने शिक्षणाची प्रेरणा घेतली. नवी सुशिक्षीत पिढी लिहिती झाली. ती दलित साहित्याची पाहिली निर्मिती. आंबेडकरांच्या विचार स्त्रोताने दलितांची जीवन धारणाच बदलली, पापपुण्य पुनर्जन्म, देवधर्म, चातुवर्ण्य इ. गुलांमीचे बंद दलितांच्या जीवन धारणेतून विचार विश्वातून हद्दपार झाले. बदलत्या जीवनधारणेतून आलेल्या प्रेरणा आंबेडकरवादी आहेत. त्यातूनच दलित साहित्यालाही खतपाणी मिळाले.

दलित साहित्याची निर्मिती एका वैचारिक भूमिकेतून झालेली आहे. ही भूमिका माणूसकीच्या शोषणाला आरपार विरोध करणारी आहे. त्यामुळेच ज्यांनी ज्यांनी या शोषणाला विरोध केला त्या सर्वांबद्दल दलित कवितेने कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. केशवसुत, श्रीपादकृष्ण कोल्हटकर, वरेरकर, मुक्तीबोधादी साहित्यिकांबद्दल दलित लेखकाने आदर व्यक्त केलेला आहे. आपल्या प्रवृत्तीशी जुळणाऱ्या साहित्यिकांबद्दल आदरभाव व्यक्त व्हावा हे स्वाभाविकही होते. तथापि दलित कवितेला आत्मभान निर्माण करणारा विचार प्राप्त झाला आहे. तो डॉ. आंबेडकर, मार्क्स, म. फुले, आणि गौतमबुध्द यांच्याकडूनच. डॉ. आंबेडकरांचा केंद्रबिंदू शोषित पिडीत समाज आहे. ज्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक शोषण केले गेले आहे असा माणूस आहे. हा शोषित सामान्य माणूस हाच मार्क्स वादाचाही केंद्रबिंदू आहे. बौध्द तत्वज्ञानात तत्कालिन शोषणाविरूध्द बंडखोर प्रतिक्रिया आहे आणि महात्मा फुल्यांनीही याच सामाजिक शोषणाविरूध्द दंड थोपटले आहेत. वेगवेगळ्या काळी भिन्न, भिन्न समाज व्यवस्थेच्या संदर्भात या चौघांचे विचार व्यक्त झाले असले तरी त्यांच्या तत्वज्ञानाचा गाभा एकच आहे आणि तो म्हणजे माणसाची शोषणापासून मुक्ती हा

होय. तथापि या चार प्रेरणास्त्रोतापैकी दलित साहित्याला आधारभूत अशी प्रेरणा लाभली ती डॉ. आंबेडकरांपासूनच. डॉ. आंबेडकर हे भारताला लाभेलेल एक फार मोठं व्यक्तीमत्व होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील दलित समाजाचे झालेली पुर्न स्थान हे भारताच्या आधुनिक इतिहासातील एक आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या होत असलेल्या घडणीतील एक रोमहर्षक वर्ष आहे. आंबेडकरांच्या प्रेरणेने मानवी अस्मितेसाठी आणि सामाजिक समतेसाठी जे आंदोलन दलित जनतेने उभारले आहे ते अजून चालूच आहे आणि समता व सामाजिक न्यायावर आधारलेली समाजव्यवस्था भारतात दृढ होईपर्यंत ते चालूच राहील'' (२६)

दलित लेखकांनी डॉ. आबेडकरांच्या संबंधी व्यक्त केलेले विचार लक्षात घेतले तर दलित साहित्याची सर्वच दृष्टीने एकमेव मुलात्म प्रेरणा डॉ. आंबेडकर हीच ठरते. कारण आंबेडकर म्हणजे न्याय, समता आणि मानवता यांचे तत्वज्ञान आहे. समाजातील विषमतामूल अन्यायकारक परिस्थिती पोसणाऱ्या प्रवृत्तीवर आंबेडकरांनीच प्रखर प्रहार केलेले आहेत. वर्णजातीय समाज व्यवस्था नष्ट करून मानवतेची प्रस्थापना जीमुळे होईल, अशी समाज रचना निर्माण करणे हे आंबेडकरांचे ध्येय होते. आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याच्या आणि नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. त्यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती जाळली आणि १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी सामूदायिक धर्मांतर घडवून आणले. डॉ. आंबेडकरांच्या विचारातून आणि अशा कृतीतून दलित समाजाला मोठी प्रेरणा प्राप्त होत गेली. त्यांच्या मुक्ती लढ्यामुळे गावकुसाबाहेरचा मरगळलेला अपमानित शोषित समाज जागा झाला आणि स्वातंत्र्य

प्राप्तीनंतर त्याने विद्रोहाचा पवित्रा धारण केला. डॉ. आंबेडकरांच्या विचाराने आणि आचरणाने दलित साहित्याला दिशा दिली. त्याला त्याचा असा खास 'स्वर' दिला. यात शंका नाही. दलित साहित्यिकांनी या आंबेडकरी प्रेरणेची नोंद जागोजागी केलेली आहे. बाबुराव बागुल ''बाबासाहेब आंबेडकरांना आपले अधिनायक मानतात'' ''दलित साहित्य चळवळीचे आद्य प्रेरक व प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असून बाकीचे आम्ही सारे पाईक आहोत'' (२७) असे गंगाधर पानतावणे सांगतात. तर राजा ढाले कबुल करतात की, ''डॉ. आंबेडकर जन्मले नसते तर आजचे प्रबोधक बौध्द अथवा दलित साहित्य जन्मालाच आले नसते. प्रा. यशवंत मनोहर ही ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एकमेव प्रेरणा म्हणून निर्देश करतात' (२८) डब्ल्यू. कपूर यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे.

''अरे राखही उरली नव्हती इथे
आणि तू ''माणसे'' निर्मिलीस
.....
शतकांच्या टोपली खालचा कोंबडा
तसाच गुदमरून मेला.
खोपटाखोपटातून असंख्य सुर्य उगवलेत
तुझ्या हाकेने मात्र''

अशी बाबासाहेबांची अभूतपूर्व कामगिरी होती.कामगीरी होती. थोडक्यात दलित साहित्याचे मुलभूत प्रेरणा स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत त्यांनी मांडलेल्या विचारातून आणि तदनुषंगाने त्यांनी केलेल्या कृतीतुनच दलित साहित्याची बैठक़ सिध्द

झालेली आहे. प्रा. बाळकृष्ण कवठेकर लिहितात ''हजारो वर्षे अंधारात खितपत पडलेल्या दलित जीवनाला डॉ. आंबेडकरांनीच आत्मभानाचा प्रकाश दिला. जागृत केले त्यांच्या ठायी स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करुन अन्यायाला निधीराने प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निर्माण केले''(२९)

दलित साहित्यातून नवचित साम्यवादी सूर ऐकू येतो. यात शंका नाही साहित्याने आंबेडकरवादी असावे की मार्क्सवादी यासंबधीचा एक वाद दलित साहित्यकांनी निर्माण केलेला आहे. डॉ. योगेंद्र मेश्राम लिहितात ''मार्क्सवादी साहित्य म्हणजे नुसत्या आर्थिक व वर्गीय दृष्टीच्या आग्रही मर्यादांनी बंदिस्त साहित्य त्यातील प्रेरणा दलित साहित्य चळवळीच्या सध्यावस्थेत तरी पोषक ठरेल असे वाटत नाही'' (३०) दलितांचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून तो मूलत: आणि वस्तुत: सांस्कृतिक व सामाजिक स्वरुपाचा आहे त्याचे त्याचे उत्तर मार्क्सवादाने मिळू शकणार नाही असे स्वत: डॉ. आंबेडकरांना वाटत होते. तथापि मार्क्सवादाचा थोडाफार प्रभाव दलित साहित्यावर आहे यात शंका नाही. ''मार्क्सवाद आणि दलित साहित्य'' या आपल्या ग्रंथात डॉ. वि. स. जोग ''दलित साहित्याची एक प्रेरणा मार्क्सवाद आहे. या निर्मितीत मार्क्सवादाचा सहभाग आहे. सामाजिक, राजकिय संघर्षातून दलित साहित्य आकारले आहे. या संघर्षाच्या पाठीमागे मार्क्सवाद आहे. राजा ढाले, नामदेव ढमाळ, केशव मेश्राम, दया पवार, बाबुराव बागुल, अर्जुन डांगळे आणि इतर अनेक दलित साहित्यिक आपल्या लेखणीची बंदूक बनवून छळकांवर रोखतात तेव्हा त्यांना पुरविण्यात येणाऱ्या बंदुकीच्या पाच गोळ्यापैकी निदान एक तरी निश्चितपणे मार्क्सवादाने पुरविलेली आहे.''

दलित साहित्याच्या प्रेरणांचा विचार करताना दलित लेखक डॉ. आंबेडकर,

मार्क्स, म. फुले आणि गौतम बुध्द यांच्या विचारांचे धन गाठीशी घेऊन अवतीभोवतीच्या वास्तवाचा वेध घेत असलेले दिसतात काहीनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर मार्क्सच्या विचारांचे तर काहीनी म. फुले आणि बुध्दाच्या विचाराचे कलम केलेले निश्चितपणे दिसून येत. तथापि बहुसंख्य दलित साहित्यिक डॉ. आंबेडकरांच्या निखळ तत्वज्ञानाचीच बांधिलकी मानत असलेले दिसते. डॉ. आंबेडकर हीच दलित साहित्याची प्रधान प्रेरणा आहे. अन्य प्रेरणांचा संबंध शोषणाच्या विरोधाशी असल्यामुळे डॉ. आंबेडकरी विचारांवर कलम करुनच त्याचा दलित लेखकांनी स्विकार केलेला दिसतो. डॉ. भालचंद्र फडके यांनी सांगितल्या प्रमाणे ''या लेखकांनी ज्या मूळ झाडावर असे कलम केलेले आहे ते मूळचे झाडच मोठे जोमदार आणि कसदार आहे.'' दलित साहित्यामध्ये जो एक जोमदारपणा आणि कसदारपणा दिसतो त्याच्या बुडाशी डॉ. आंबेडकरांची शक्तीशाली प्रेरणा आहे.

संदर्भ सुची

१) खरात (डॉ.) प्रकाश ''डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार''
ऋचा प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती पृष्ठ -१२

२) उनि., पृ. १३

३) उनि., पृ. २९

४) उनि., पृ. ३०

५) उनि., पृ. ५६-५७

६) उनि., पृ. ५८

७) उनि., पृ. ९१

८) उनि., पृ. ९२

९) कुरुंदकर नरहर - ''हनकाय'' दिवाळी अंक पृ. ७६,५९

१०) मनोहर यशवंत - ''दलित साहित्य सिध्दांत आणि स्वरुप''
प्रबोधन प्रकाशन औरंगाबाद १९७८

११) देशपांडे गों. फ.- 'सत्यकथा' मार्च १९७३ मुंबई पृ. ९

१२) सरदार गं. बा. - ''दलित साहित्य'' जाणीव, प्रवृत्ती व प्रेरणा पृ. १६१

१३) खरात शंकरराव - ''दलित वाङमय प्रेरणा आणि प्रवृत्ती'' इनामदार बंधु प्रकाशन, पुणे १९७८ पृ. ११९

१४) मांडे प्रभाकर - ''दलित साहित्याचे निराळेपण'' धारा प्रकाशन औरंगाबाद १९७९ पृ. ७९

१५) मेश्राम (डॉ.) योगेंद्र - ''दलित साहित्य'' जेव्हा चळवळ बनते साहित्य आणि सामाजिक बांधीलकी - पृ. १२

१६) सुर्वे नारायण - ''दलित साहित्य नवे आत्मशोधन'' लेख विचार भारती (ऑक्टोबर - नोव्हेंबर - १९९२)

१७) जोग (डॉ. प्रा.) वि. स.- मार्क्सवाद आणि दलित साहित्य'' संबोधिनी प्रकाशन मुंबई १९८५ पृष्ठ १४

१८) बागुल बाबुराव - ''फु. आ. मा.'' नियतकालीक एका यशस्वी लेखकाची मुलाखत.

१९) आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब - ''जातीभेद निर्मूलन पृ. १२८

२०) गाजरे (प्रा) मा. फ. - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे (खंड-२) १९७४ पृ. १५२

२१) आंबेडकर (डॉ.) भी. रा. - डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्यांना संदेश नवयुग अंबेडकर विशेषांक १३ एप्रिल १९४७

२२) सरदार (प्रा.) गं. भा. - दलित साहित्य एक अभ्यास या ग्रंथातून उद्धूत साहित्य संस्कृती मंडळ (सं. पा. अर्जून डांग्ले) १९७८ पूर्ण पृ. २२२

२३) फडके भालचंद्र - ''दलित साहित्य'' वेदना विद्रोह श्री. विद्या प्रकाशन १९७७ पुणे पृ. ६५

२४) खरात शंकराव - ''दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती इनामदार बंधु प्रकाशन पुणे १९७८ पृ. २८

२५) मेश्राम (डॉ.) योगेंद्र - दलित साहित्य केव्हा चळवळ बनते प्रकाशक सौ. नंदिनी तु. गवळी कोल्हापूर १९८७ पृ. ६७

२६) डांगळे अर्जून - दलित साहित्य एक अभ्यास दोन शब्द प्रथमावृत्ती १९७८ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई पृष्ट १

२७) 'अस्मितादर्श' - जाने-फेब्रुवारी-मार्च १९७६ पृष्ठ २२

२८) मनोहर यशवंत - दलित साहित्य सिध्दांत व स्वरुप प्रबोधन प्रकाशन नागपूर १९७८ पृ.५९

२९) कवठेकर (प्रा.) बाळकृष्ण - ''दलित साहित्य'' एक आकलन पृथमावृत्ती अजब पुस्तकालय कोल्हापूर पृष्ठ -४

३०) मेश्राम (डॉ.) योगेंद्र - ''दलित साहित्य जेव्हा चहवळ बनते. प्रचार प्रकाशन कोल्हापूर प्रथमावृत्ती १९८७ पृ. १५६

३१) जोग (डॉ.) वि. स. - मार्क्सवाद आणि दलित साहित्य'' संबोधन प्रकाशन पुर्ण प्रथमावृत्ती १९८५ पृ. १९